पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक १३ वा | रविवार, दि. २६ जुलै २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# अखेर मोदी सरकार युवकांच्या आंदोलनासमोर झुकलं





## केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

## आता शिक्षण व्यवस्थेत सुधारणा व्हावी - सोनम वांगचुक

## मराठी माणूस मोडेन पण वाकणार नाही- अभिजित दिपके

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनला सर्वात मोठं यश मिळालं आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. नीट पेपर फुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारुन प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी सीजेपीनं लावून धरली होती.

यासाठी महिन्याभरापासून सीजेपीचं आंदोलन सुरू होतं. अखेर प्रधान यांनी राजीनामा दिला आहे.

नीट पेपर फुटी प्रकरणी सीजेपीसह काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आक्रमक भूमिका घेतली. सीजेपीच्या प्रवक्त्यांनी सरकार सोबत झालेल्या दोन बैठकांमध्ये राजीनाम्याचा विषय लावून धरला. पण सरकार याबद्दल फारसं अनुकूल नव्हतं. तर दुसऱ्या बाजूला प्रधान यांची राजीनाम्याबद्दल कोणतीही तडजोड होणार नाही, अशी ठाम भूमिका सीजेपीनं घेतली होती. यानंतर अखेर प्रधान यांनी राजीनामा दिला.

सीजेपीच्या शिष्टमंडळाशी आज तिसऱ्या टप्प्यातील चर्चा सरकार करणार होतं. दुपारी साडे तीनच्या सुमारास बैठकीची वेळ ठरली होती. ही बैठक होण्यापूर्वीच धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिलेला आहे. प्रधान यांनी त्यांचा राजीनामा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केलेला आहे. पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या मंत्रिमंडळात काम करण्याची संधी दिल्याबद्दल प्रधान यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

सोशल मीडियावर राजीनाम्याची घोषणा करताना प्रधान यांनी मंत्रिपदावरुन पायउतार होण्यामागील कारणदेखील सांगितलं आहे. '२० लाखांहून अधिक विद्यार्थी नीटची परीक्षा देतात. ती परीक्षा निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीनं होण्यास प्राधान्य दिलं. त्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा प्रशासन, विद्यार्थी आणि पालकांच्या साथीनं २१ जून २०२६ रोजी पुन्हा यशस्वीरित्या परिक्षेचं आयोजन केलं. १६ जुलैला या परिक्षेचा निकाल लागला. त्यात अनेक गरीब आणि वंचित कुटुंबांमधील प्रतिभा संपन्न विद्यार्थ्यांना यश मिळालं. पण काही जबाबदार पदांवर बसलेल्यांनी विद्यार्थ्यांची दिशाभूल केली. त्यामुळे मला दुःख झालं,' असं प्रधान यांनी एक्स पोस्टमध्ये नमूद केलं आहे.

नरेंद्र मोदी २०१४ मध्ये पासून सत्तेत आहेत. केंद्रात त्यांच्या सरकारची तिसरी टर्म सुरू आहे. मोदी गेल्या १२ वर्षांपासून पंतप्रधान पदावर आहेत. या कालावधीत केवळ ७ नेते मोदींसोबत त्यांच्या मंत्रिमंडळात राहिले आहेत या ७ नेत्यांमध्ये प्रधान यांचा समावेश होता. गेल्या १२ वर्षांपासून प्रधान नॉट आऊट होते. अखेर नीट पेपर फुटी प्रकरणात त्यांची विकेट गेलेली आहे.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता अनेकांच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर सोनम वांगचुक यांनी पहिली प्रतिक्रिया देत हा लोकशाहीचा विजय असल्याचं म्हटलं आहे. तसेच 'आता शिक्षण व्यवस्थेत सुधारणा व्हावी आणि देश चालवण्याची पद्धत आता तरी बदलेल', अशी अपेक्षा सोनम वांगचुक यांनी सरकारकडे व्यक्त केली आहे.

**सोनम वांगचुक काय म्हणाले?**

'आमच्या देशाच्या लोकशाहीची जी शक्ती आहे, ती शांततेमुळे आहे. विद्यार्थ्यांचा विजय निश्चितच झालेला आहे, पण आपल्या विजयातही विनम्रता असली पाहिजे. तसेच फक्त एका राजीनाम्यामुळे राष्ट्र बनत नसतं. आता शिक्षण व्यवस्थेत देखील बदल झाले पाहिजेत. देशाच्या शिक्षण व्यवस्थेत काही सुधारणा झाल्या पाहिजेत. मला अपेक्षा आहे की सरकार आता त्यांच्या कामातही सुधारणा करेल', अशी अपेक्षा सोनम वांगचुक यांनी व्यक्त केली.

'फक्त शिक्षण व्यवस्थेतच नाही, तर प्रशासन चालवण्याच्या पद्धतीत देखील सुधारणा केल्या पाहिजेत. प्रेमाने आणि संवादाने देश चालवला जाऊ शकतो. कोणावरही अन्याय होऊ नये, देश कायम सत्याच्या मार्गाने चालवला गेला पाहिजे. देशात जिथे कुठे भ्रष्टाचार असेल, तो भ्रष्टाचार संपवला पाहिजे. भारत कायम जगासाठी एक चांगलं उदाहरण, विश्वगुरु बनला पाहिजे', अशी अपेक्षा सोनम वांगचुक यांनी व्यक्त केली.

दिल्लीत आंदोलकांशी संवाद साधताना अभिजीत दिपके म्हणाला की, या सरकारमध्ये राजीनामे होत नाहीत असे हे लोक म्हणायचे. झुकती है दुनिया झुकाने वाला चाहिये. नीटचा पेपर लीक झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली होती, त्यांना न्याय मिळाला आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी तर राजीनामा दिलेला आहे, जर तुम्ही या सरकारला घाबरला नाहीत, जर या सरकारविरोधात तुम्ही झुकला नाहीत तर चांगल्यात चांगल्या मंत्र्याचाही आपण राजीनामा घेऊ शकतो. आपल्या देशात लोकशाही आहे आणि आपण घाबरता कामा नये. जर बोलताना आपल्याला भिती वाटत असेल तर कसली लोकशाही? जर तुम्ही तुमचा आवाज बुलंद केला तरच हे लोक वठणीवर येतील. आज हे सत्ताधारी लोक स्वतःला राजे समजतात, त्याचे कारण आपण त्यांना सत्तेत बसवले आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे पण आमच्या आणखी दोन मागण्या आहेत. त्या पूर्ण झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, आम्ही कॉक्रोच आहोत, एकदा घुसलो तर सहजासहजी निघत नाही. पण ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे, त्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची नुकसानभरपाई मिळालीच पाहिजे. ज्या पोलिसांनी तरुणांवर लाठीचार्ज केला, त्या पोलिसांविरोधात कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी दिपकेने केली आहे. डीसीपी संदीप लांबा, एसीपी अजय शर्मा, सचिन शर्मा यांनी मोदी शहांच्या सांगण्यावरून आंदोलकांवर लाठ्या चालवल्या. जर आम्ही एका मंत्र्याचा राजीनामा घेऊ शकतो तर तुम्ही कोण आहात? 20 तारखेपासून ज्या ज्या आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले आहेत, त्यांच्यावरचे सगळे गुन्हे मागे घेतले पाहिजे, असेही अभिजीत दिपके म्हणाला.

# पंढरपूर कॉरिडॉरचे काम योग्य पुनर्वसन करून पूर्ण करणार : मुख्यमंत्री फडणवीस

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दरवर्षी वाढणारी भक्तांची गर्दी पाहता त्यांना उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर परिसर विकासाचे काम पंढरपूर कॉरिडॉरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

कोणावरही अन्याय न करता सर्वांचे योग्य पुनर्वसन करून हे काम येत्या अडीच वर्षांत पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त आज (दि. २५) श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी बाबासाहेब माधव माने, सौ. प्रभावती बाबासाहेब माने यांच्यासमवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने झालेल्या सत्कारप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर, अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, सुरेश खाडे, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

मागील काळात सुरू केलेले मंदिर विकासाचे काम बहुतांश पूर्ण झाले असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी लाखो लोक येतात. येथे अत्यंत कमी जागा आहे. आता मोठी जागा तयार करणे गरजेचे आहे. यावर्षी हे काम सुरू करायचे आहे. कॉरिडॉर विकासात येथील व्यावसायिकांचा व्यवसाय वाढेल, नागरिकांना घरे मिळतील, भाडेकरूंची व्यवस्था होईल, अशा पद्धतीने त्याची रचना करण्यात आली आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर कितीही भाविक आले तरी अतिशय उत्तम व्यवस्था या ठिकाणी होईल."



### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्कार वितरण

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पाणी, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त वारी, वृक्षसंवर्धन आदी विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांना 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कौंडण्यपूर, द्वितीय क्रमांक वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान, जालना आणि तृतीय क्रमांक गोऱ्हेकर संस्था, आळंदी देवाची यांना पुरस्कार व धनादेश देण्यात आला.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, "यावेळी वारीने एक नवा उच्चांक गाठला आहे. यावर्षी २५ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीची दर्शनासाठी रांग लागली होती. परंतु दर्शनासाठी २५ तास लागले तरीही कोणीही नाराज न होता, न थकता त्या ठिकाणी आनंदाने विठ्ठल नामाचा गजर करत हे दर्शन घेत आहेत. चंद्रभागेचे पाणी स्वच्छ राहील याची काळजी घेण्यात आली आहे. यावेळी पालकमंत्र्यांनी वाळवंटात अतिशय सुंदर व्यवस्था केल्यामुळे तिथला कचरा, विष्ठा आदी संपूर्ण स्वच्छता झाली आहे. त्यामुळे अतिशय सुंदर वाळवंट आपल्याला पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. आपण सर्वजण करत असलेली सेवा श्री विठ्ठल स्वीकारतील आणि त्यांचा आशीर्वाद आपल्या सर्वांना सदैव मिळेल, अशी प्रार्थना मी त्यांच्या चरणी करतो."

"लाखो भक्त विठुरायाच्या दर्शनासाठी पायी निघतात. अनेक वारकरी कळसाच्या दर्शनावरच समाधान मानतात. जणू काही विठुरायाचीच भेट झाली आहे, अशा भावनेने लोक जातात. या अनोख्या सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणे ही देखील एक पर्वणी आहे. महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने आपला प्रतिनिधी म्हणून केलेली ही पूजा संपूर्ण महाराष्ट्रातील आणि जगभरातील पांडुरंगाच्या भक्तांच्या वतीने केलेली पूजा आहे," असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, "येणारा वारकरी हा शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार, उद्योजक अशा सर्व क्षेत्रातील आहे. विठुरायाची सेवा जरी आपल्याला करता आली नाही, तरी वारकऱ्यांची, शेतकऱ्यांची सेवा केली तरी ती सेवा विठुरायापर्यंत पोहोचते. त्यामुळे यावर्षी शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडावे यासाठी ५६ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय आणि थकीत वीजबिले माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे."

प्रारंभी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रास्ताविक केले. "श्री विठ्ठल मंदिराला पाठबळ देणे, निधी देणे आणि विकास करण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. आज विठुमाऊलीच्या दर्शनासाठीच्या रांगेचे अत्यंत चांगल्या प्रकारे व्यवस्थापन केले आहे. दर्शन रांगेत ५० ते ६० हजार वारकरी असले तरी पालकमंत्र्यांनी राज्य शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातून अत्यंत चांगल्या सुविधा केल्यामुळे दर्शन सुसह्य झाले आहे," असे ते म्हणाले.

शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. गौरगाव, ता. कळंब, जि. धाराशिव येथील बाबासाहेब माधव माने आणि प्रभावती माने या दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांच्या हस्ते महापूजेनंतर सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना वर्षभर मोफत एसटी प्रवास पास मुख्यमंत्री यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.


SINHGAD INSTITUTES
सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
एन बी नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग
केगांव - सोलापूर
A NAAC
CGPA 3.15 / 4.00
Approved by AICTE, New Delhi, Recongnised by DTE (M S) and Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur



प्रा. एम. एन. नवले
संस्थापक - अध्यक्ष

ENGINEERING ADMISSIONS
For First Year & Direct Second Year B. Tech. Programs in AY 2026-27
M.Tech. (Civil Engineering-Structural) & Recognised Ph.D. Centre in Civil Engineering
DTE CODE EN 6640
Applications are invited from eligible candidates for admissions under probable Vacant Seats against CAP & IL Quota

राष्ट्रीय स्तरावरील अनेक मानांकने प्राप्त महाविद्यालय

- सोलापूर विद्यापीठाकडून 'A++' ग्रेड प्राप्त महाविद्यालय (91.66%)
- नॅक कडून 'A' ग्रेड प्राप्त महाविद्यालय (CGPA 3.15/4)
- भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय व AICTE कडून ARIIA मानांकन
- स्मार्ट इंडिया हॅकेथॉन (SIH) या राष्ट्रीय स्पर्धेत सलग 2 वर्ष ₹ 1 लाखाचे प्रथम पारितोषिक
- CAREERS360 कडून 'AA+' Grade सहित India's Best Engineering Institutes 2026 म्हणून मानांकन
- उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार 2024
- उत्कृष्ट कॉलेज पुरस्कार 2023
- उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार 2023
- भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय व Innovation Cell कडून 5 पैकी 4.5 स्टार मानांकन
- Intelliswift कंपनी तर्फे Innovate स्पर्धेत प्रथम पारितोषिक

Think Placement... Think Sinhgad

Excellent Placement Record

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Highest Package in LPA | 18.55 | Students with Package of 7+ LPA | 28 | Students Placed in Core Industries | 126 |
| Average Package in LPA | 4.5 | Students with Package of 5+ LPA | 37 | Students Placed in IT Industries | 117 |
| Total Students Placed | 243 | Students with Package of 4+ LPA | 178 | Entrepreneurs and Higher Studies | 31 |

अभियांत्रिकीच्या उज्वल करिअर साठी संधीचे प्रवेशद्वार "सिंहगड सोलापूर"

| Sr.No. | Name of the Course | Program Code | Intake |
|---|---|---|---|
| 1 | B.Tech. (Civil Engineering) | 664019110 | 60 |
| 2 | B.Tech. (Computer Science & Engg) | 664024210 | 60 |
| 3 | B.Tech. (Electrical Engineering) | 664029310 | 60 |
| 4 | B.Tech. (E & TC Engineering) | 664037210 | 60 |
| 5 | B.Tech. (Mechanical Engineering) | 664061210 | 120 |
| 6 | M.Tech. (Civil Engineering-Structural) | 664021210 | 18 |

NEP नुसार AI-DS, EV या सारख्या विषयात Minor Degree घेण्याची संधी...
विविध सेंटर्सवर मोफत ऑप्शन फॉर्म भरण्याची व मार्गदर्शनाची सोय उपलब्ध.
Contacts for Admission : 97303 93182, 83800 25624, 70209 96697, 83800 25630


# एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव (सोलापूर) येथे २७ व २८ जुलै २०२६ रोजी "International Conference on AI-Driven Materials, Energy and Smart Technologies (AIMEST-2026)" या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ शंकर नवले यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आधारित संशोधन, प्रगत मटेरियल, शाश्वत ऊर्जा आणि स्मार्ट तंत्रज्ञान या क्षेत्रांतील नव्या संशोधनाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.



या परिषदेच्या अध्यक्षस्थानी सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर तथा संस्थेचे सचिव संजय नवले हे राहणार असून, माजी कुलगुरू तथा सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक डॉ. एस. एच. पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच डॉ. अजय कुमार द्विवेदी (Senior Member, IEEE तथा Professor, Cambridge Institute of Technology, Bengaluru) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना संबोधित करणार आहेत.

परिषदेत देश-विदेशातील नामवंत संशोधक, प्राध्यापक, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच विद्यार्थी सहभागी होऊन आपले संशोधनपर शोधनिबंध सादर करणार आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग, ऊर्जा व्यवस्थापन, प्रगत मटेरियल, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), रोबोटिक्स, शाश्वत तंत्रज्ञान तसेच उदयोन्मुख अभियांत्रिकी संशोधन या विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने, तांत्रिक सत्रे आणि संशोधन निबंधांचे सादरीकरण आयोजित करण्यात आले आहे.

परिषदेत सादर होणाऱ्या उत्कृष्ट संशोधन निबंधांना 'Best Paper Award' प्रदान करण्यात येणार असून, सर्व सहभागी संशोधकांना प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. या परिषदेमुळे संशोधक, उद्योग क्षेत्र आणि शैक्षणिक संस्थांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण होऊन भविष्यातील संशोधनाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य समन्वयक डॉ. एस. एस. शिरगण हे असून, परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्राध्यापक व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. या परिषदेत संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## संपादकीय

# शिक्षण सुधारण्याची वेळ

शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण, परीक्षा व्यवस्थेवरील प्रश्नचिन्हे आणि गुणवत्तेच्या आव्हानांमुळे आज शिक्षण व्यवस्थेचा सर्वंकष पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

शिक्षण हा कोणत्याही समाजाच्या प्रगतीचा आणि विकासाचा मुख्य पाया असतो. चांगल्या शिक्षणाचा अर्थ केवळ परीक्षांमध्ये मिळालेले गुण, सर्वोच्च टक्केवारी किंवा पदवी मिळवणे एवढाच मर्यादित नसतो. विद्यार्थ्यांना विचार करण्याची क्षमता देणे, त्यांच्यात चांगल्या मूल्यांची जपणूक करणे आणि त्यांना देशाचे एक जबाबदार नागरिक बनवणे ही शिक्षणाची खरी भूमिका असते; परंतु दुर्दैवाने आजच्या काळात शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मोठ्या प्रमाणावर बदलला आहे. शिक्षण हे समाजसेवेचे माध्यम न राहता अनेक ठिकाणी तो एक मोठा व्यवसाय बनल्याची भावना पालकांच्या मनात निर्माण होत आहे. त्यामुळे आजच्या संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा सर्वंकष विचार करण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे.

खासगी शाळांनी शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक अत्याधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, हे वास्तव नाकारता येत नाही; परंतु दुसरीकडे या शाळांचे सतत वाढणारे शुल्क सामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी एक मोठा आर्थिक ताण ठरत आहे. आपल्या मुलांच्या चांगल्या भविष्यात खंड पडू नये म्हणून अनेक पालक कर्ज काढून किंवा स्वतःच्या दैनंदिन गरजा बाजूला ठेवून फी भरतात. या परिस्थितीमुळे शिक्षण हा सर्वांसाठी समान संधी देणारा मूलभूत अधिकार उरला आहे की तो केवळ आर्थिक श्रीमंतीवर अवलंबून असलेला एक विशेषाधिकार बनला आहे ? यासाठी खासगी शाळा पूर्णपणे बंद करणे हा उपाय नसून, शाळांच्या शुल्कात पारदर्शकता आणणे, शिक्षणाच्या गुणवत्तेवर शासकीय नियंत्रण असणे आणि सरकारी शाळांचा दर्जा उंचावणे यावर अधिक भर दिला पाहिजे.

आजच्या परीक्षा व्यवस्थेबाबतही अनेक शंका आणि चिंता व्यक्त केल्या जात आहेत. राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या प्रवेश परीक्षांचे पेपर फुटण्याच्या घटनांमुळे विद्यार्थी आणि पालकांचा संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो. वर्षानुवर्षे दिवस-रात्र मेहनत करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांना काही लोकांच्या गैरप्रकारांमुळे त्रास सहन करावा लागणे अत्यंत अन्यायकारक आहे. या घटनांमुळे संपूर्ण शैक्षणिक चौकटीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते.

याच पार्श्वभूमीवर अनेक घटकांकडून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी केवळ बारावीच्या गुणांचा आधार घ्यावा, अशी मागणी केली जात आहे. सध्या विद्यार्थ्यांना एकाच प्रवेशासाठी वारंवार वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. यामुळे त्यांच्यावर मानसिक ताण, आर्थिक खर्च आणि अतिरिक्त स्पर्धात्मक भार वाढतो; मात्र सर्व राज्यांतील मूल्यमापन पद्धती आणि मंडळे समान नसल्यामुळे केवळ बारावीच्या गुणांवर प्रवेश देणेही आव्हानात्मक ठरू शकते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना समान न्याय देणारी, पारदर्शक आणि अत्यंत विश्वासार्ह प्रवेश प्रक्रिया विकसित करणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या भरती प्रक्रियेतही मोठे बदल करणे गरजेचे आहे. केवळ पात्रता परीक्षा ही शिक्षकांची मूळ गुणवत्ता तपासण्यासाठी पुरेशी असू शकत नाही. विषयाचे सखोल ज्ञान, शिकवण्याचे कौशल्य, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची कला आणि प्रत्यक्ष मुलाखत या सर्व बाबींचा विचार करून शिक्षकांची निवड केली पाहिजे. यामुळे शिक्षण व्यवस्थेत अधिक सक्षम आणि समर्पित शिक्षक येऊ शकतील. शिक्षणाच्या या संपूर्ण प्रवासात पालकांचा सहभागही अधिक संस्थात्मक आणि प्रभावी असायला हवा. पालकांची भूमिका ही केवळ वेळेवर शाळांचे शुल्क भरण्यापुरती मर्यादित राहू नये. प्रत्येक शाळेत पालकांचे प्रतिनिधित्व करणारी एक सक्षम व्यवस्थापन समिती असणे अत्यंत गरजेचे आहे. एखादा शिक्षक सातत्याने अध्यापनात निष्काळजीपणा करत असेल किंवा आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत नसेल, तर या समितीला तक्रार करण्याचा आणि चौकशीची मागणी करण्याचा अधिकार असावा. यामुळे शिक्षकांमध्ये उत्तरदायित्वाची भावना वाढेल आणि शिक्षणाचा दर्जा सुधारेल.

शिक्षणाशी संबंधित प्रश्नांवर आज राजकीय वाद आणि आरोप-प्रत्यारोप होताना दिसतात. शासनाने आपल्या चुकीच्या निर्णयांमध्ये सुधारणा करण्याची तयारी दर्शवली पाहिजे, तर विरोधकांनी केवळ टीका न करता विधायक आणि योग्य पर्याय सरकारसमोर ठेवले पाहिजेत. विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य कोणत्याही राजकीय संघर्षाचे साधन बनता कामा नये. आज गरज आहे ती शासकीय शाळांचा दर्जा उंचावण्याची, खासगी शाळांच्या शुल्कावर नियंत्रण ठेवण्याची आणि विद्यार्थ्यांवरील अनावश्यक ताण कमी करण्याची. शिक्षण ही स्पर्धा नसून सर्वांना पुढे जाण्याची एक समान संधी असावी, तरच एक सक्षम राष्ट्र निर्माण होऊ शकेल.

# कारगिल विजय दिवस : शौर्य, बलिदान आणि भारताच्या विजयाचा सुवर्ण अध्याय

शि २६ जुलै १९९९ हा दिवस भारतीय इतिहासातील अभिमानाचा दिवस आहे. याच दिवशी भारतीय सैन्याने 'ऑपरेशन विजय' यशस्वीरीत्या पूर्ण करून कारगिलच्या दुर्गम पर्वतरांगांमधून पाकिस्तानी घुसखोरांना हुसकावून लावत ऐतिहासिक विजय मिळवला. म्हणूनच दरवर्षी २६ जुलै हा दिवस 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो.

कारगिल हा लडाखमधील अत्यंत दुर्गम आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश आहे. श्रीनगरपासून सुमारे २०५ किलोमीटर अंतरावर असलेल्या या भागात हिवाळ्यात प्रचंड हिमवृष्टी होते. तापमान उणे ५० ते ६० अंश सेल्सिअसपर्यंत घसरते आणि अनेक लष्करी चौक्या बफार्खाली जातात. भारत-पाकिस्तानमधील सिमला करारानुसार काही उंच चौक्या हिवाळ्यात रिकाम्या करण्यात येत असत. याच परिस्थितीचा फायदा घेत पाकिस्तानने १९९९ च्या हिवाळ्यात गुप्तपणे भारतीय हद्दीत घुसखोरी केली.

मे महिन्याच्या सुरुवातीला स्थानिक मेंढपाळांनी भारतीय सैन्याला संशयास्पद हालचालींची माहिती दिली. त्यानंतर भारतीय सैन्याने टेहळणी केली असता मोठ्या प्रमाणावर पाकिस्तानी सैनिकांनी भारतीय चौक्यांवर कब्जा केल्याचे स्पष्ट झाले. या घुसखोरीची माहिती वेळेवर मिळू न शकल्यामुळे भारतीय गुप्तचर यंत्रणांवरही मोठ्या प्रमाणावर टीका झाली.

या आव्हानाला उत्तर देण्यासाठी भारताने 'ऑपरेशन विजय' सुरू केले. २६ मे १९९९ पासून भारतीय सैन्य आणि हवाई दलाने संयुक्त कारवाईला सुरुवात केली. उंच पर्वतांवर बसलेल्या शत्रूवर खालील बाजूने चढाई करणे हे अत्यंत कठीण आणि धोकादायक काम होते. रात्रीच्या अंधारात, गोठवणाऱ्या थंडीत आणि शत्रूच्या गोळीबाराचा सामना करत भारतीय जवानांनी अतुलनीय शौर्य दाखवले.

तोलोलिंग आणि टायगर हिल या लढाया कारगिल युद्धातील सर्वात निर्णायक ठरल्या. ४ जुलै १९९९ रोजी टायगर हिलवर पुन्हा तिरंगा फडकला आणि त्यानंतर युद्धाचे पारडे पूर्णपणे भारताच्या बाजूने झुकले. भारतीय सैन्याने बोफोर्स तोफांचा प्रभावी वापर करून शत्रूच्या बंकरांचा अचूक वेध घेतला.

कारगिल युद्धात भारतीय हवाई दलानेही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. समुद्रसपाटीपासून १६,००० ते १८,००० फूट उंचीवर उड्डाण करणे हे मोठे आव्हान होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत मिग-२७, मिग-२९ आणि मिराज-२००० विमानांनी अचूक हल्ले करून भारतीय सैन्याला मोठी मदत केली.

सुमारे ७७ दिवस चाललेल्या या युद्धात जवळपास ३० हजार भारतीय सैनिकांनी सहभाग घेतला. या संघर्षात ५२७ भारतीय जवान शहीद झाले, तर १,३०० हून अधिक जवान जखमी झाले. त्यांच्या अद्वितीय शौर्यामुळे भारताने प्रत्येक इंच भूभाग पुन्हा ताब्यात घेतला.

कारगिल युद्ध हे केवळ लष्करी विजय नव्हते, तर भारताच्या संयम, मुत्सद्देगिरी आणि नैतिक भूमिकेचाही विजय होता. भारताने नियंत्रण रेषा ओलांडली नाही आणि युद्ध कारगिल परिसरापुरतेच मर्यादित ठेवले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायाने भारताच्या संयमी भूमिकेचे कौतुक केले, तर पाकिस्तानवर जगभरातून टीका झाली. अखेर पाकिस्तानला आपले सैन्य माघारी घ्यावे लागले.

कारगिल युद्धानंतर पाकिस्तानचे काही माजी लष्करी अधिकारी आणि विश्लेषकांनीही हे मान्य केले की या मोहिमेत पाकिस्तानच्या नियमित सैन्याचाच सहभाग होता. या युद्धामुळे पाकिस्तानला लष्करी, राजनैतिक आणि नैतिक अशा तिन्ही स्तरांवर मोठा फटका बसला.

कारगिल युद्ध भारतीय लोकसभा बरखास्त असताना झाले होते. तरीही सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नावर एकजूट दाखवून भारतीय लोकशाहीची परिपक्वता जगासमोर सिद्ध केली.

कारगिल विजय दिवस हा केवळ विजयाचा उत्सव नाही, तर मातृभूमीसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांच्या शौर्याला आणि त्यागाला कृतज्ञतेने वंदन करण्याचा दिवस आहे. त्यांचे बलिदान प्रत्येक भारतीयाला राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा आणि देशासाठी सर्वस्व अर्पण करण्याची प्रेरणा देत राहील.

कारगिलच्या रणांगणावर मातृभूमीसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व वीर जवानांना कोटी कोटी प्रणाम !



**- श्याम ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे

# कै. सदाशिवराव रामचंद्र मोरे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने देण्यात येणारे कै. सदाशिवराव रामचंद्र मोरे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेच्या सहा शिक्षकांचा या पुरस्काराने सन्मान होणार आहे.

रविवारी दि. २६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता होटगी रोडवरील हॉटेल बालाजी सरोवर येथे पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बीओएसएस कॉन्फरन्स बँकचे चेअरमन संजीव खडके, पुणे पीपल्स मल्टिस्टेट को-ऑप. बँकेचे चेअरमन श्रीधर गायकवाड, लोकमंगल को-ऑप. बँकेचे चेअरमन तथा आमदार सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे, माजी आ. दिलीप माने, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुकुंद पवार, उपनिबंधक उमेश पवार तसेच जिल्हा विशेष लेखा परीक्षक व्ही. बी. डोके यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनोरमा को-ऑप. बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे राहणार आहेत. मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना कै. सदाशिवराव रामचंद्र मोरे यांनी केली. त्यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो.

पुरस्काराचे हे १८ वे वर्षे आहे. संयोजक प्रिया सुरवसे, राहुल सुरवसे यांच्यासह निवड समितीने ही निवड केली आहे.

या पत्रकार परिषदेला मनोरमा मल्टीस्टेट चेअरमन शोभा मोरे, संचालिका डॉ. ऋचा पाटील, गजेंद्र साळुंखे, सुहास भोसले, चंद्रकांत खरटमल, मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी यांच्यासह बँकेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**हे आहेत आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी**

कै. सदाशिवराव रामचंद्र मोरे आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी असे - वैशाली ज्ञानेश्वर कार्वेकर (जिल्हा परिषद शाळा, शेटे वस्ती तालुका उत्तर सोलापूर), निर्मला लक्ष्मण केदारलिंगे ( जिल्हा परिषद शाळा, जगताप वस्ती तालुका मोहोळ), राहुल रामू राठोड (जिल्हा परिषद शाळा, बेलाटी तालुका उत्तर सोलापूर.), चंद्रकांत पुंडलिक नवले ( जिल्हा परिषद शाळा, वाघोली तालुका मोहोळ), रमेश गोविंद जाधव( जिल्हा परिषद शाळा, इंदिरानगर कासेगाव तालुका दक्षिण सोलापूर), विजय अच्युत गुंड (जिल्हा परिषद शाळा, गावडे वस्ती तालुका मोहोळ) आदींना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# पंढरपूर येथील नवीन पोलीस उपमुख्यालयासाठी अप्पर पोलीस अधीक्षक पदास मंजुरी

## आ. अभिजीत पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर येथे स्वतंत्र पोलीस उपमुख्यालयाठी अप्पर पोलीस अधीक्षक पद निर्माण करण्याची मागणी शासनाकडे आमदार अभिजीत पाटील यानी पत्राद्वारे तसेच अर्थसंकल्पीय अधिवेशनात सभागृहात मांडली होती. पंढरपूरच्या वाढत्या गरजा शासनाच्या निदर्शनास आणून देत सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता.

आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री वारीदरम्यान लाखो वारकरी येथे दाखल होतात. वर्षभर धार्मिक कार्यक्रम, व्हीआयपी दौरे, परदेशी पर्यटकांची ये-जा आणि वाढती



लोकसंख्या यामुळे कायदा व सुव्यवस्थेवर मोठा ताण पडतो. ही गरज ओळखून राज्य सरकारने पंढरपूर येथे नवीन पोलीस उपमुख्यालयासाठी अप्पर पोलीस अधीक्षक पद निर्माण करण्याचा निर्णय घेतला.

या निर्णयामुळे पंढरपूरसह मंगळवेढा, सांगोला व अकलूज उपविभागातील पोलीस प्रशासन अधिक सक्षम होईल. वरिष्ठ स्तरावर तातडीने निर्णय घेणे शक्य होऊन मोठ्या धार्मिक उत्सवांचे नियोजन अधिक शिस्तबद्ध होईल. वारकरी, भाविक, नागरिक व पर्यटक यांना अधिक सुरक्षित वातावरण मिळण्यास याची निश्चितच मदत होईल.

पंढरपूरच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन घेतलेल्या या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे मनःपूर्वक आभार आमदार अभिजीत पाटील यांनी मानले.

वारकरी संप्रदाय व लाखो भाविकांच्या सुरक्षिततेसाठी घेतलेला हा निर्णय पंढरपूरच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरेल, असा विश्वासाचा ठरेल असेही आमदार अभिजीत पाटील म्हणाले.

# एका राजकीय कावळ्याचा कारनामा ?

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील एका मोठ्या पक्षाच्या पदाधिकाऱ्याला,काही लोकांनी कावळ्याची उपमा देऊन,काही प्रमाणात त्या कावळ्याने केलेल्या करामती व कारनामा कथन केल्यामुळे, राजकीय वतुर्ळात त्या राजकीय कावळ्याबद्दल चचेर्चा विषय बनला आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा कावळा म्हणजे व्यक्ती असून, नुकतेच त्याने मोठ्या पक्षाचे पद,पदरात पाडून घेतले आहे. कोणत्याच प्रकारचा काम धंदा न करता, या राजकीय कावळ्याने पाच दहा कोटीची संपत्ती मिळवली असल्याची माहिती मिळाली.मिळालेल्या माहितीनुसार नुकतीच त्याने 1 कोटीच्या आसपास, पंढरपूर परिसरात जमीन खरेदी केली असून, त्याचे अकलूज परिसरात तीन आलिशान बंगले आहेत. तर अनेक चार चाकी,दोन चाकी वाहने त्याच्याकडे आहेत. अकलूज परिसरात वेगवेळ्या भागात त्याच्या जागा आहेत. विनाकर्म, विनाकष्ट करता एवढी मोठी संपत्ती जमवली कशी ?असा प्रश्न जनतेतून उपस्थित होत आहे.

अकलूज या शहराला सोलापूर जिल्ह्यातील राजकीय राजधानी म्हणून ओळखले जाते. शहरात सर्वच पक्ष कार्यरत आहेत.शिवाय वेगवेगळ्या सामाजिक संघटनाही आहेत. तसे पाहिले तर सर्व प्रकारच्या सामाजिक उन्नतीची गुरुकिल्ली म्हणजे राजकीय शक्ती समजली जाते आणि ती राजकीय शक्ती मिळवायची असेल तर त्यासाठी प्रामाणिकपणे पक्षाचे, संघटनेचे काम करणे आवश्यक असते. निःस्वार्थी भावनेने सामाजिक, विधायक कार्य करून दाखवले पाहिजे. तरच पक्ष, पार्टी मोठी संधी उपलब्ध करून देऊ शकते. परंतु एखाद्या पक्षाने दिलेल्या संधीचा गैरवापर होत असेल तर एखाद्या चांगल्या प्रामाणिक कार्यकर्त्यावर अन्याय झाल्यासारखा आहे ?



ज्या व्यक्तीला कावळा पक्षाची उपमा देऊन, खरोखरच कावळा पक्षावर अन्याय केल्यासारखा आहे.कारण कावळा पक्षी खूप प्रामाणिक, अत्यंत हुशार आणि सामाजिक पक्षी आहे. तो उङ्म१५४२ या पक्षीवंशातील आहे. तो अतिशय बुद्धिमान असून समस्या सोडवणे, साधनांचा वापर करणे आणि माणसांचे चेहरे ओळखणे यांसारखी क्षमता त्याच्यात आढळते. हिंदू परंपरेत श्राद्ध आणि पितृपक्षात कावळ्याला अन्न अर्पण करण्याची प्रथा आहे.

कावळा हा फक्त "काव-काव" करणारा पक्षी नसून, निसगार्तील स्वच्छता राखण्यात आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा अत्यंत बुद्धिमान पक्षी आहे अशा बुद्धिमान पक्षाची, भ्रष्टबुद्धीच्या व्यक्तीला कावळ्याची उपमा देणे चुकीचे असल्याचे मत एका कार्यकत्यार्ने व्यक्त केले.

# आई, वडील, संत हेच खरे आपल्या जीवनातील उत्तम मार्गदर्शक - ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदोरीकर

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** कर्माला माफी नाही, या कलियुगात माणूस संताशिवाय सुखी होणार नाही, या जगाला सुखी व्हायचं असेलतर, हरी नामा शिवाय पर्याय नांही, मी पणा व अहंकार अंगिकारल्यामुळे माणसाच्या जीवनाचा अंत होतो. या पासून माणूस लांब राहिल्यास आनंद व समाधान मिळते, आई, वडील, संत हेच खरे आपल्या जीवनातील उत्तम मार्गदर्शक असून, या युगात माणसाला किंमत नसून पैशाला किंमत असल्याने माणसातला माणुसकीपणा हरवत चालला आहे. असे परखड मनोगत राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर यांनी व्यक्त केले. आषाढी एकादशीच्या पूर्व संध्येला अन्नछत्र मंडळातील कीर्तनास हाउसफुल्ल गर्दी झालेली होती. श्रोतेगण कीर्तन व प्रबोधनाने मंत्रमुग्ध झाले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३९ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवनिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, शुक्रवारी राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर (संगमनेर, अकोलेकर) यांच्या 'किर्तन' कार्यक्रमाने ६ वे पुष्प संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर व न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज, व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी निवृत्ती महाराजांचे स्वीय सहायक ह.भ.प. रामायणाचार्य राजन महराज काशीद वैराग, ह.भ.प. रामेश्वर जाधव, ह.भ.प. भैरवनाथ महराज जाधव, पंढरपूर, ह.भ.प. नामदेव घावटे (मृदुंगाचार्य), गणेश पवार, पंढरपूर, मंगेश उपासे, माधवाचार्य महाराज वैष्णव मठ, सोलापूर हे उपस्थित होते.

दरम्यान राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर यांचा सत्कार न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन करण्यात आला. याप्रसंगी शिल्पकार प्रशांत खेडकर पुणे यांचा देखील सत्कार न्यासाच्या वतीने करण्यात आला.

न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. या कीर्तनाला श्री विठ्ठल वारकरी शिक्षण संस्था पंढरपूर व वैराग सोलापूर येथील वारकऱ्यांनी साथ दिली. यांच्या समवेत तालुक्यातील कोळेकरवाडी येथील ह.भ.प.चंद्रकांत डांगे हे उपस्थित होते.



पुढे बोलताना राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर यांनी आई-वडील, संत भगवंत या शिवाय माणसाचे जिवन शून्य असून, सध्याच्या विविध घडामोडीवर वृत्ती, वल्ली व कृती या बाबतचे कलियुगातील दाखले देत सडेतोड व परखड विचार व्यक्त करत भक्ती, शक्ती, धर्म-संस्कार प्रबोधन या त्रिवेणी संगमात लाख भक्तजनांना आनंदाचे डोही आनंद तरंग अशी अनभुती दिली. प्रचंड गदीर्मुळे न्यासाचा परिसरात ठिकठिकाणी स्क्रीनद्वारे प्रक्षेपण करण्यात आले होते.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, अनुयाताई संदीप फुगे, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्वाती निकम, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, स्मिता कदम, संगीता राठोड, पल्लवी कदम, उज्वला भोसले, संगीता भोसले, रूपा पवार, छाया पवार, सरोजनी मोरे, प्रिया निकम, स्वप्ना माने, तृप्ती बाबर, सुवर्णा घाडगे, कविता भोसले, क्रांती वाकडे, अनिता गडदे, दिव्या मोरे, कल्पना मोरे, अक्षता मोरे, कोमल क्षीरसागर, शितल क्षीरसागर, अक्षता खोबरे, हिरकणी संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य व न्यासाचे उपाध्यक्ष- अभय खोबरे, सचिव- शामराव मोरे, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, कु. समर्थ संदीप फुगे, विश्वस्त- लक्ष्मण पाटील, लाला राठोड, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, दिलीपभाऊ सिद्धे, नगरसेवक तम्मा मामा शेळके, राजाभाऊ निकम, मनोज निकम, अरविंद शिंदे, ओंकारेश्वर उटगे, सौरभ मोरे, प्रवीण देशमुख, वैभव मोरे, अतिश पवार, प्रवीण घाडगे, निखील पाटील, शिवराज स्वामी, सिद्धेश्वर मोरे, बाळासाहेब कुलकर्णी बबलादकर, सर्फराज शेख, प्रशांत साठे, मैनुद्दीन कोरबू, अश्पाक काझी, असद फुलारी, स्वामिनाथ गुरव, प्रभाकर मजगे, रोहित खोबरे, अश्पाक काझी, रोहित पाटील, राहुल भंडारे, अप्पा हंचाटे, अप्पू कलबुर्गी, आकाश शिंदे, रोहन शिर्के, स्वामिनाथ बाबर, प्रा. सायबण्णा जाधव, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, आकाश सूर्यवंशी, किरण पाटील, विरुपाक्ष कुंभार, चेतन जाधव, राजाराम पवार, सुमित कल्याणी, अमर मसरे, शुभम सावंत, यश विभूते, बलभीम पवार, गोविंदराव शिंदे, धनप्पा उमदी, कुमार सलबत्ते, शहाजीबापू यादव, कुमार पाटील, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, मल्लिकार्जुन बिराजदार, आकाश शिंदे, प्रसाद हुल्ले, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, शरद भोसले, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, अनिल बिराजदार, श्रीशैल कुंभार, महांतेश स्वामी, संजय गोंडाळ, प्रसाद मोरे, वैभव मोरे, फहीम पिरजादे, केदार तोडकर, योगेश पवार, निखील शिंदे, अभिषेक चव्हाण, अमित कोळी, लक्ष्मण शिंदे, आकाश सूर्यवंशी, विनायक भोसले, सुमित घाटगे, समर्थ घाटगे, सैदप्पा इंगळे, भरत राजेगावकर, अशोक मलगोंडा, संतोष माने, बाबू मसुती, मल्लिनाथ खुबा, किरण साठे, ज्ञानेश्वर भोसले, समर्थ चव्हाण, राहुल इंडे, रमेश हळसंगी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठलराव रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. श्रोत्यांच्या प्रचंड गदीर्मुळे न्यासाच्या परिसरात एल.इ.डी. ची सोय करण्यात आलेली होती. त्या ठिकाणची सुद्धा जागा हाउसफुल्ल झालेली होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ट लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल व मंडप सजावट कल्लप्पा छकडे यांनी केले.

**साता समुद्र पार :**

न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या अन्नछत्र हे मनोभावे सेवा करणारे संस्था आहे. या माध्यमातून धार्मिक कार्य बरोबरच अन्य उपक्रम देखील हे उल्लेखनीय रित्या राबविल्या जात आहेत. श्री क्षेत्र अक्कलकोटचे नांव श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने साता समुद्र पार केले.

**परखडपणे समाज प्रबोधन :**

राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्त महाराज यांनी संत तुकाराम, एकनाथ, निवृत्ती महाराज, ज्ञानदेव, मुक्ताबाई, सोपान व ज्ञान, देव, ध्यान, नम्रता, लक्ष्मी,मी पणा, संपत्ती, दया, संत देव, सुख समाधान याबाबत उदाहरणासह अभंगातील दाखला देत मन मुराद, उपस्थितांनी टाळ्यांचा गजरात सद्य स्थितीवर त्यांनी परखडपणे समाज प्रबोधन केले. श्रीक्षेत्र अक्कलकोट हे गुरु पीठ आहे. या गुरु पिठात अन्नछत्राच्या माध्यमातून सुरु असलेले महाप्रसादा बरोबरच विविध उपक्रमाचे कौतुक केले.

## वात्रटिका

### झुरळ गिरी

अटीतटीच्या लढतीत
कोण जिंकले कोण हरले...
झुकणार नाही म्हणणारे
आता चहुबाजूंनी घेरले...
आटापिटा केला त्यांनी
आणि भारी पडले झुरळ...
नाकीनऊ आले कसरतीने
आणि केरात गेले मुसळ...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# शेतकऱ्यांना कर्जमुक्ती प्रमाणपत्रांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते वितरण

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत' सोलापूर जिल्ह्यातील सात शेतकऱ्यांना कर्जमुक्ती झाल्यामुळे प्रातिनिधिक स्वरूपात कर्जमुक्तीचे प्रमाणपत्र आणि जिल्हा बँकेच्यावतीने नव्याने पीककर्जाचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे वितरीत करण्यात आले. संकटांमध्ये आलेल्या व कर्ज भरू शकला नाही अशा शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कर्जमाफी देण्याचा शब्द राज्यशासनाने पाळला असून देशातली ही सर्वात मोठी कर्जमाफी राबविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित सुधाकरपंत परिचारक राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, उत्तमराव जानकर, नारायणराव पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड आदी उपस्थित होते.

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नियमित कर्ज भरलेल्या शेतकऱ्यांनाही त्यांच्या खात्यावर ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. कर्जमाफीची भव्य सुरुवात करण्याऐवजी पांडुरंगाच्या नगरीत जिथे शेतकरी, वारकरी इतक्या मोठ्या प्रमाणात येतात, तिथून याची सुरुवात करावी या उद्देशाने आज येथून कर्जमाफीची सुरुवात करण्यात येत आहे. त्यानुसार सहकार विभागाने १७ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर केली असून १३ हजार कोटी रुपये या शेतकऱ्यांच्या खात्यावर ३१ तारखेपूर्वीच जमा करण्यात येणार आहेत. यापुढे जसजशी बँकाकडून माहिती जमा होईल तसतशा पुढील याद्या जाहीर करून कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येईल. एकही पात्र शेतकरी या योजनेतून मागे राहणार नाही, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

ते पुढे म्हणाले, ७.५ हॉर्स पॉवरच्या आतील कृषीपंपांची वीजबिल माफी देण्यासाठी दरवर्षी २४ ते २५ हजार कोटी रुपये राज्य सरकार आपल्या तिजोरीतून महावितरणला देते. आता कर्जमुक्तीबरोबरच यापूर्वीची या कृषीपंपांची थकीत वीज देयकांची रक्कमही माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ५० लाख शेतकऱ्यांचं ४८ हजार कोटी रुपयांचे वीजबिल माफ केलेले आहे. आता राज्यातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना आपण दिवसा वीज देतो आहोत. येत्या डिसेंबर किंवा मार्चपर्यंत १०० टक्के शेतकऱ्यांना आम्हाला दिवसा १२ तास वीज देण्यात येणार आहे.

कर्जमाफी, विजदेयकांच्या रकमेची माफी याव्यतिरिक्त गतवर्षी शेती क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या सबसिडींच्या माध्यमातून, ठिबक सिंचन, खते, ट्रॅक्टर किंवा यांत्रिकीकरण आदींसाठी सुमारे ९५ हजार कोटी खर्च केले आहेत. शेतकऱ्यांच्या पाठीशी हे सरकार अतिशय ताकदीने उभे आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले, वारीची परंपरा शतकानुशतके चालली असून दरवर्षी लाखो वारकरी चालत चालत पंढरपूरपर्यंत येतात. वारीमध्ये प्रत्येकालाच पांडुरंगाचे दर्शन मिळतेच असे नसले तरी कोणी कळस दर्शन, कोणी मुख दर्शन, नामदेव पायरीचं दर्शन घेतात आणि पांडुरंगाची भेट झाल्याचा अनुभव प्रत्येक वारकऱ्याला या ठिकाणी प्राप्त होतो. वारीच्या परंपरेत प्रत्येक व्यक्ती समोरचा वारकरी, व्यक्तीमध्ये आपल्या माऊलीचे दर्शन घेत असतो. आणि अत्यंत भावनिक आणि कौटुंबिक असा वारीचा सोहळा आपल्याला पंढरपूरमध्ये पाहायला मिळतो.

यावेळी विक्रमी असे ३५ लाखांपेक्षा जास्त वारकरी पंढरपूरला येत आहेत. जवळजवळ २१ किलोमीटरची दर्शनाची रांग यावेळी लागलेली आहे. मात्र राज्य शासन, जिल्हा प्रशासनाच्यावतीने अतिशय उत्तम सेवा करण्याचा



प्रयत्न केला आहे. वारकऱ्यांच्या निवाससाठी जर्मन हँगर्स, तेथे पाद्य सेवा, वैद्यकीय सेवा आदी सर्व प्रकारच्या सेवा अतिशय उत्तम पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला आहे. वारीची परंपरा अशीच वाढत राहणार असून त्याप्रमाणे दरवर्षी सुविधा देण्याचे काम करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत सर्वांचे शंभर टक्के पुनर्वसन

पंढरपूरच्या कॉरिडॉर विकासाची जवळजवळ सर्व तयारी झाली आहे. काही थोड्या लोकांच्या मनात शंका असल्या तरी चर्चेतून त्या सर्व शंका दूर करून सर्वांचे चांगल्यात चांगले पुनर्वसन करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातल्या कुठल्याही तीर्थक्षेत्रामध्ये आजपर्यंत झालेल्या पुनर्वसनापेक्षा उत्तम, चांगलं आणि मोठं पुनर्वसन हे या ठिकाणी आम्ही पंढरपूरच्या कॉरिडॉरमध्ये देत आहोत. १०० टक्के लोकांचे समाधान करण्याचा उद्देश घेऊन हे काम आम्ही करत आहोत, असेही ते म्हणाले.

पंढरपूरमध्ये ३०-३० लाख शिस्तबद्ध पद्धतीने लोक येतात. मात्र, अपघात हा सांगून येत नाही. त्यामुळे सर्वांच्या मनामध्ये वारी संपून आणि वारकरी सुखरूप घरी जाईपर्यंत सर्व नीट व्हावे अशी एक भीती असते. या वाढत्या वारकऱ्यांकरता आणि आता देशभरातून दर्शनकरिता येणाऱ्या भाविकांची योग्य व्यवस्था व्हाव्यात, या दृष्टीने खऱ्या अर्थाने या सगळ्या व्यवस्था येथे केल्या असून पंढरपूर कॉरिडॉरमुळे चांगल्या सुविधा निर्माण होतील, असेही ते म्हणाले.

२०१५-१६ साली स्व. सुधाकरपंत परिचारक यांनी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून या प्रदर्शनाची सुरुवात केली. पंढरपूरला येणारा वारकरी हा शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार आहे. म्हणून त्यांच्यापर्यंत शेतीच्या क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, नवीन प्रयोग पोहोचले पाहिजेत, या दृष्टीने या कृषी प्रदर्शनाची सुरुवात झाली. राज्यातल्या उत्तम बाजार समित्यांमध्ये गणना होत असलेली ही बाजार समिती अतिशय उत्तम कारभार करत असून १६ कोटींपासून प्रचंड मोठी भरारी घेत समितीने मोठा विस्तार केलेला आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी बाजार समितीचा गौरव केला.

### शेतीमध्ये 'एआय'ला चालना; 'महा विस्तार' ॲपचा वापर करावा

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, आपल्या शेतीमध्ये आधुनिकता आली पाहिजे, उत्पादनाचा खर्च कमी करता आला पाहिजे, उत्पादकता वाढली पाहिजे जेणेकरून शेतकऱ्यांचा नफा वाढला पाहिजे, अशा पद्धतीने आज आपण राज्यात वेगवेगळे प्रयोग सुरू केले आहेत. भविष्यामध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ताचे (एआय) महत्त्व ओळखून, देशात पहिल्यांदा महाराष्ट्राने शेतकऱ्यांकरिता 'महा विस्तार' नावाचे एआय ॲप तयार केले आहे. जवळपास ५० लाख शेतकऱ्यांनी महा विस्तारवर नोंदणी केली असून उर्वरित शेतकऱ्यांनीही या ॲपवर नोंदणी करून उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

'महा विस्तार' म्हणजे एक प्रकारचा एआय एजंट असून आपण त्याच्याशी संवाद साधून शेतीशी संबंधित खतांचा वापर, कीड प्रतिबंध, पाण्याचं वापर आदी सर्व विषयांवरील प्रश्नांची उत्तरे, ज्ञान, माहिती जाणून घेऊ शकता. आधुनिक शेतीच्या प्रयोगाचे व्हिडिओ त्याच्यावर असून त्याच्यावर आहे. कुठल्याही नवीन पीक पद्धतीमध्ये काय केलं पाहिजे याची माहिती त्यात असून सगळ्या गोष्टींची माहिती ही प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या त्याच्या बोली भाषेत पर्सनलाईज्ड पद्धतीने तेथे मिळते. पुढील काळात 'माती परीक्षण'पासून सर्व सुविधा, पद्धती या केवळ आपल्या मोबाईलच्या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळवून देण्यात येणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

भीमा नदीवर बॅरेजेस बांधण्याच्या मागणीच्या अनुषंगाने बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, आंतर राज्य लवादाचा निर्णयाची बंधने पाळतानाच त्यातून मार्ग काढून कशा पद्धतीने हे बंधारे तयार करता येतील, या संदर्भातले निर्देश संबंधित विभागाला देण्यात येईल. तसेच चंद्रभागा नदीवरचा जो नवीन पूल आहे, तो आता 'पूल कम बंधारा' असा परिवर्तित करून त्याही ठिकाणी पाणी करसे अडवता येईल, याचाही हा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

दरवर्षी कोल्हापूर आणि सांगलीमध्ये शिरणाऱ्या पुराच्या पाण्यावर डायव्हर्जन कॅनल आपण सुरू केला असून यावर्षीच त्याचे काम पूर्ण होत आहे. यामुळे ३५ ते ४० टीएमसी पाणी हे तेथून उजनीमध्ये आणण्यात येणार आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यासह येथील दुष्काळी भाग आणि मराठवाड्याचा भाग या दोन्ही भागांना खूप मोठ्या प्रमाणात फायदा होईल. या पाण्यामुळे उजनीमधील मृत साठा वापरावा लागण्याची परिस्थिती पुढील काळात राहणार नाही.

रेल्वे मार्गाच्या अनुषंगाने बोलताना ते म्हणाले, पंढरपूरला तसेच सोलापूर जिल्ह्याला संपूर्ण दक्षिणेशी जोडण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू.

लोणंद-पंढरपूर रेल्वेमागार्साठी आपण पैसे दिले आहेत काम सुरू करायचे आहे. परंतु, पंढरपूर-विजापूर रेल्वेसाठीही मागील काळात केंद्र सरकारला विनंती केली असून त्याचा पाठपुरावा करण्यात येईल, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

पालकमंत्री गोरे म्हणाले, शेतकऱ्यांना कर्जमाफी, वीजमाफी देण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. शेतकरी समृद्ध, मजबूत होईल अशा पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कार्यकाळात काम केले आहे. ही वारी वारकऱ्यांना आनंद देणारी स्वच्छ आणि सुंदर अशी वारी होत आहे. जवळपास ३५ लाख वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी येत आहेत. पंढरीचा कॉरिडॉर च्या माध्यमातून वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी पायाभूत सोयी निर्माण करण्याचा मानस मुख्यमंत्री फडणवीस यांना केली आहे. त्यामुळे हे आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र होईल, असेही ते म्हणाले.

यावेळी परिचारक यांनी प्रास्ताविकात मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राबविलेल्या योजनांचा गौरवपूर्ण उल्लेख करत कर्जमुक्तीबद्दल मुख्यमंत्र्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमात मुख्यमंत्री यांच्यावरील ' इन्फ्रामॅन : देवेंद्र फडणवीस- मेकिंग ऑफ महाराष्ट्रा' या पुस्तकाचे तसेच निवासी मूकबधिर विद्यालय पंढरपूरच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी प्रदर्शनातील दालनांना भेट देऊन माहिती जाणून घेतली.

कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात वारकरी, शेतकरी उपस्थित होते.

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक: SLP/०४२८१/१८/२५
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:-१७७६/२०२५

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग, सोलापूर.**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री रेणुका माता (यल्लम्मा देवी) देवस्थान ।
न्यासाचा पत्ता:- मालमत्ता नं. ८५८ उंबरे (पागे), टालुक पंढरपूर, डिस्ट्रिक्ट सोलापूर, सोलापूर, पंढरपूर, उंबरे
अर्जदार-शहाजी माणिक मुळे,

सर्व संबंधित लोकास जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Samai Pitali 1 Nag | 1001 |
| 2 | Ghanta Pitali | 7000 |
| 3 | Palakhi Sagvani | 15000 |
| 4 | Abdagiri | 2000 |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. २५००१/- मात्र(अक्षरी रुपये पंचवीस हजार एक मात्र फक्त)
स्थावर मिळकत (वर्णन):-

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| मौजे उंबरे ता. पंढरपूर जि.सोलापूर | मालमत्ता क्र. ८५८ | पू.प×उ.द =२०×२१ चौ.फुट, यात आर.सी.सी स्लॅब मंदिर | No | Temple | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. ०/- मात्र

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २४-०७-२०२६ रोजी दिली.

कोर्टाचा शिक्का

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर विभाग,सोलापुर.**

## श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगांव (टें)

स्थापना : १९७९ — **ता. माढा, जि. सोलापूर ४१३२१०** — रजि. नं. एफ. ६५६
संस्थापक : मा.आ.बबनरावजी विठ्ठलरावजी शिंदे — चेअरमन : विक्रमसिंह बबनराव शिंदे
सचिव : पोपट राजाराम खापरे

जा.क्र.- एस.व्ही.एस.पी.एम.एन./४५/२०२६ — दिनांक २५/०७/२०२६

### जाहीर प्रसिद्धीकरण

तमाम लोकास विशेषतः तालुका माढा जिल्हा सोलापूर येथील सर्व नागरिक शाळेचे विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच संबंधित शाळेचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ निमगाव (टें) तालुका माढा जिल्हा सोलापूर (संस्था नोंदणी क्रमांक. एफ ६५६ सोलापूर) या संस्थेमार्फत गंगामाई नगर पिंपळनेर तालुका माढा जिल्हा सोलापूर येथे सुरू असलेले १. आर्या पब्लिक स्कूल (इयत्ता १ली ते इयत्ता १०वी इंग्रजी माध्यम), २. आर्या पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज (इयत्ता ११वी ते इयत्ता १२वी विज्ञान शाखा) ३. सरस्वती विद्यामंदिर (इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी मराठी माध्यम) प्राथमिक सह माध्यमिक, उच्च माध्यमिक, प्राथमिक हे सर्व शैक्षणिक युनिट सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीसह विठ्ठल प्रतिष्ठान निमगाव (टें) तालुका माढा जिल्हा सोलापूर (संस्था नोंदणी क्रमांक. एफ-२२६८२ सोलापूर) या संस्थेस हस्तांतरित करण्याचे प्रस्ताव तयार करून मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

तमाम संस्थेशी निगडीत लोकास या नोटीसीने कळविण्यात येते की, उपरोक्त तीनही शैक्षणिक युनिट हस्तांतरण करण्यासंबंधी काही हरकती, अडचणी, शंका, तक्रार इत्यादी असल्यास आपल्या ओळखीच्या पुराव्यासह माननीय शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडे लेखी पत्राद्वारे १५ दिवसाच्या आत कळिवण्यात यावे. त्यानंतर आलेल्या तक्रारीचा अजिबात विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली. तारीख :२६/०७/२०२६

**सही/-**
**अध्यक्ष**
**श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगांव (टें)**
**ता. माढा, जि. सोलापूर**

# अनगरच्या कै. शंकरराव बाजीराव पाटील विद्यालयात बालदिंडी उत्साहात

**अनगर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी एकादशीच्या निमित्ताने येथील कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बालदिंडीचा सोहळा भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात श्री अनगर सिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा माजी प्राचार्य चंद्रकांत ढोले यांच्या शुभहस्ते पालखी पूजनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आदी संतांच्या वेशभूषेत, टाळ-मृदुंगाच्या गजरात तसेच अभंग-भजनांच्या सुरावटीत आकर्षक बालदिंडी काढून परिसर भक्तिमय केला.

यावेळी विद्यार्थ्यांना वारकरी



संप्रदायाची परंपरा, संतांचे विचार, संस्कार, एकोपा, सामाजिक समरसता आणि भारतीय संस्कृतीचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे बालदिंडीला विशेष आकर्षण प्राप्त झाले.

या प्रसंगी प्राचार्य महादेव चोपडे, उपप्राचार्य माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके, ज्येष्ठ शिक्षक परमेश्वर थिटे, प्राथमिक विभागाच्या अनुराधा गोडसे, अनिता लांडगे, गीतांजली माळी, रंजना सरक, माधवी पाचपुंड, अनुपमा वरवटकर, ज्योती भडकवाड, तसेच ह.भ.प. तात्या गायकवाड, अंकुश शिंदे, रविंद्र बोडके, बब्रुवान बोडके यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेत बालदिंडी यशस्वी केली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना संतपरंपरा, वारकरी संप्रदाय आणि भारतीय संस्कृतीची ओळख होण्यास मदत झाली. उपस्थितांनी विद्यालयाच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करून विद्यार्थ्यांमध्ये संस्कारमूल्ये रुजविणाऱ्या अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

# आषाढी वारीत ७.२३ लाखांहून अधिक वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागाने आषाढी वारी २०२६ दरम्यान लाखो वारकरी भाविकांना सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली. 'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत आजपर्यंत ७ लाख २३ हजार ८२ वारकरी भाविकांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली आहे.

आषाढी वारी हा महाराष्ट्राच्या अध्यात्म, संस्कृती आणि सेवाभावाचा सर्वोच्च सोहळा आहे. या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकरी भाविकांच्या आरोग्याची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक आरोग्य विभागाने स्वीकारत पालखी मागार्पासून पंढरपूरपर्यंत व्यापक आरोग्य यंत्रणा उभी केली. यंदाच्या वारीत प्रथमच एअर ॲम्बुलन्स आणि 'आरोग्यसंपन्न वारी' या डिजिटल ॲपच्या माध्यमातून आरोग्य सेवा अधिक गतिमान आणि तंत्रज्ञानाधारित करण्यात आल्या.

आरोग्य विभागाने पालखी मार्गावर ३५३ रुग्णवाहिका, ४३ सुसज्ज आयसीयू, १५६ 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना', २१५ आरोग्यदूत, ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच ३०२ तज्ज्ञ डॉक्टर यांची नियुक्ती केली. पंढरपूरमध्ये २४ तास कार्यरत आयसीयू, दोन दिवसांचे महाआरोग्य शिबिर, मोफत चष्मा वाटप, डिजिटल मॅपिंग, पाणी स्रोतांचे निर्जंतुकीकरण, डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधात्मक उपाययोजना, हॉटेल व धाब्यांतील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी, स्वच्छता अभियान आणि व्यापक आरोग्य जनजागृती यांसारख्या विविध सेवा प्रभावीपणे राबविण्यात आल्या.

आजपर्यंत ७ लाख १८ हजार ६३५ बाह्यरुग्णांवर उपचार करण्यात आले असून ४ हजार ४४७ रुग्णांना आंतररुग्ण सेवा देण्यात आली आहे. तसेच १ हजार ५३३ रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले आहे. विविध आजारांवरील तपासणी व उपचारांमुळे वारकऱ्यांना वेळेत आरोग्य सेवा उपलब्ध झाली.


## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.


### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण
४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे
८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी
१०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा **
१४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत)
१९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे
२५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी
२७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव
३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया
३२) किमानच्या विरूध्दार्थी
३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको
४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट
४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष
४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच
५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 13

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | | 9 | | | 3 | | |
| 1 | 9 | 3 | 4 | | | | | 8 |
| | | | | 8 | | | 9 | 7 |
| | 5 | | 7 | | 4 | 2 | | |
| | 1 | 2 | | | | 7 | 3 | |
| | 4 | 9 | | 3 | 2 | 6 | | |
| | | 5 | 8 | 7 | | 9 | | |
| 2 | | 6 | | | | 8 | 5 | 1 |
| 9 | | | 2 | | 6 | 4 | | 3 |

# वारकरी परंपरेचा जागर; सिंहगडच्या दिंडीतून सामाजिक संदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव, सोलापूर येथे आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेचा जागर करत भक्तिमय वातावरणात भव्य आणि पर्यावरणपूरक दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. "ज्ञानोबा-तुकाराम", "जय जय रामकृष्ण हरी" आणि "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" या अखंड नामघोषाने संपूर्ण विद्यालय परिसर विठ्ठलमय झाला.



कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा) अश्विनी पाटील आणि फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विकास देशमुख यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या मूर्ती व पालखीचे पूजन करून करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव, सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विद्यालयाच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले व निखहत शेख, सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक डॉ. एस. एच. पवार, इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रविंद्र व्यवहारे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यालयाच्या रमन, कलाम, होमी आणि विक्रम या चारही हाऊसच्या विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संतपरंपरेचे आकर्षक दर्शन घडविले. भगव्या पताका, पालखी, टाळ-मृदंग, वीणा, लेझीम, फुगडी, रिंगण, अभंग आणि भारूड यांच्या सादरीकरणाने वातावरण भक्तिरसाने भारावून गेले.

या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक मूल्यांचा संदेश देणारे विविध फलक हातात घेत जनजागृती केली. "झाडे लावा, पर्यावरण वाचवा", "वडिलधाऱ्यांचा सन्मान करा", "नेहमी खरे बोला", "मोबाईलमध्ये कमी गुंतूया, मैदानी खेळ खेळूया", "व्यसनमुक्त समाज घडवूया", "स्त्री-सन्मान हीच खरी संस्कृती", "स्वच्छता राखा", "राष्ट्रीय एकात्मता जपूया" अशा घोषवाक्यांद्वारे विद्यार्थ्यांनी समाजापुढे सकारात्मक संदेश ठेवला. पर्यावरणपूरक दिंडीच्या या संकल्पनेने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत चोखामेळा तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या वेशभूषेतून संतपरंपरेचे जिवंत दर्शन घडविले. प्रत्येक हाऊसने वारीचे महत्त्व, सामाजिक समता, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, स्त्री-सन्मान आणि भारतीय संस्कृतीचे जतन या विषयांवर आधारित देखावे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

प्रमुख पाहुण्या अश्विनी पाटील यांनी आपल्या मनोगतात वारकरी संप्रदाय हा केवळ धार्मिक परंपरा नसून शिस्त, सेवा, समता, प्रेम, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारा महान सांस्कृतिक वारसा असल्याचे सांगितले. आधुनिक शिक्षणाबरोबरच भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांचा स्वीकार करून विद्यार्थ्यांनी आदर्श नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले.

पालखी मिरवणूक, रिंगण सोहळा, अभंग गायन, भारूड, हरिपाठ, सामूहिक आरती आणि प्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत वारकरी परंपरेचा आनंद अनुभवला.

या भव्य, भक्तिमय आणि पर्यावरणपूरक दिंडी सोहळ्याने विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या संतपरंपरेची ओळख करून देतानाच भारतीय संस्कृती, पर्यावरण संवर्धन, शिस्त, समता, सेवाभाव आणि सामाजिक मूल्यांची प्रभावी शिकवण दिली.

# मुख्यमंत्री सहायता कक्षाला प्रा. रामदास झोळ फाउंडेशनकडून एक लाख रुपयांचा धनादेश

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजप नेते प्रा. रामदास झोळ यांनी सामाजिक बांधिलकी जपत प्रा. रामदास झोळ फाउंडेशन, करमाळा तालुका यांच्या वतीने मुख्यमंत्री सहायता कक्षासाठी एक लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.



मुंबई येथे २१ जुलै २०२६ रोजी हा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. राज्यात नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्ती उद्भवल्यास तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्ण व गरजू नागरिकांना तातडीची मदत करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता कक्षामार्फत निधीचा वापर केला जातो. अशा महत्त्वाच्या कार्यासाठी दिलेल्या या आर्थिक योगदानामुळे अनेक गरजू रुग्ण व आपत्कालीन परिस्थितीतील कुटुंबांना दिलासा मिळण्यास मदत होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

प्रा. रामदास झोळ हे सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय असून, समाजोपयोगी कार्याला नेहमीच प्राधान्य देत आले आहेत. यापूर्वीही सन २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वाशिंबे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच करमाळा तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला होता. त्याचबरोबर मुख्यमंत्री सहायता कक्षालाही एक लाख रुपयांचा धनादेश देऊन सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपली होती.

प्रा. झोळ यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. भविष्यातही अशाच प्रकारे समाजहिताचे उपक्रम राबवावेत, अशा शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अनंत चैतन्य प्रशालेचा 'आषाढी दिंडी सोहळा' भक्तीमय वातावरणात संपन्न

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक व धार्मिक वैशिष्ट्य मानले जाणारे "विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ किंवा हरिहरा भेद नाही" अशा स्वरूपाचे सर्वधर्मसमभावाचे शिकवण देणारे वारकरी संप्रदाय विठुमाऊलीच्या दर्शनाच्या ओढीने आसुसलेला, ऊन, वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता, घरदार सोडून, वय विसरून बेभान होऊन पंढरपुरच्या दिशेने निघालेला, नित्यनेमाने वारी करणारा वारकरी व त्याची भक्ती याची अनुभूती व्हावी याकरिता -महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे आज "वारी पर्यावरण रक्षणाची व विठुमाऊलीचा दिंडी सोहळा कार्यक्रम" अतिशय उस्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला.



प्रारंभी प्राचार्य ज्ञानदेव शिंदे यांच्या हस्ते" विठ्ठल- रुक्मिणी माता पालखी, ज्ञानेश्वर महाराज पालखी व तुकाराम महाराज पालखी या तिन्ही पालखीची पुजा करून आरती करण्यात आली. यानंतर शाळेपासून ते गावातून दिंडी निघाली तेंव्हा गावातील अनेक माताभगिनीनी "विठ्ठल- रुक्मिणी" पालखीचे पाणी घालून, नारळ फोडून जंगी स्वागत केले. टाळ, मृदुंग, वीणा, कपाळास टीळा, गळ्यात तुळशीमाळ घालून, वैष्णव पताका खांद्यावर घेऊन, मुखाने हरिनामाचा जयघोष करत, झिम्मा, फुगडी, कोलांट उडी, रिंगण, भजन करत निघालेली पांढऱ्या वेशभूषेतील मुले व साडी नेसलेल्या मुलींमुळे जणू वारीचेच स्वरूप आले होते. व मुलां- मुलींनी या दिंडी सोबतच गावकऱ्यांना वारीच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. अप्रतिम अशा या दिंडी सोहळा व पर्यावरण रक्षणाच्या वारीचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य तथा आधारवड मा. सिध्देश्वर कल्याणशेट्टी,संस्थेच्या संचालिका व जि.प. सदस्या शांभवीताई कल्याणशेट्टी, उपसभापती मा. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, संस्थेच्या सी. ई. ओ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पुनम कोकळगी यांनी कौतुकासह अभिनंदन केले. ही वारी यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे समस्त शिक्षक बंधू- भगिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आषाढी एकादशीनिमित्त मोरवडमध्ये भक्तिमय पायी वारी; वृक्षदिंडीतून पर्यावरणाचा जागर

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी एकादशीचे औचित्य साधून महात्मा ज्योतिराव फुले विद्यालय, मोरवड (ता. करमाळा) येथे भक्तिमय वातावरणात आषाढी पायी वारी आणि विद्यार्थी वृक्षदिंडी उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण मोरवड गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. या दिंडीत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात, विठ्ठलनामाचा जयघोष करत गावातून पायी वारी काढली. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षदिंडीचेही आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी हातात रोपे घेऊन पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व गावात पोहोचविले.

दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध भक्तिगीते सादर करत त्यावर आकर्षक नृत्याविष्कार सादर केले. त्यांच्या सादरीकरणाला ग्रामस्थ, पालक तसेच भाविकांनी भरभरून प्रतिसाद दिला. संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, ठिकठिकाणी दिंडीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.









मोरवड गावातील बाबदेव वस्तीवरील ग्रामस्थांनी दिंडीत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करून त्यांचे स्वागत केले. ग्रामस्थांच्या या सहकार्यामुळे कार्यक्रमाला अधिक उत्साह प्राप्त झाला. या उपक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक नवनाथ मोहोळकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सदाशिव मोहोळकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष वसंत मोहोळकर (आबा) यांनी मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी आणि सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे अभिनंदन करत अशा सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, सामाजिक जाणीव आणि पर्यावरणाबाबतची जागरूकता वाढीस लागते, असे मत व्यक्त केले.

